

यशवंतराव चव्हाण सेंटर
विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा

# यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक पुरस्काराच्या अटी व शर्ती

## पुरस्काराचे स्वरूप :

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नावे दरवर्षी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक पुरस्कार दिला जातो.

१. कृषी औद्योगिक समाज रचना / व्यवस्थापन प्रशासन
२. सामाजिक एकात्मता / विज्ञान - तंत्रज्ञा
३. ग्रामीण विकास / आर्थिक - सामाजिक विकास
४. मराठी साहित्य संस्कृती / कला-क्रीडा

या क्षेत्रांपैकी कोणत्याही एका क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस पारितोषिक व स्मृतिचिन्ह देण्यात येईल.

## पुरस्काराची पात्रता :

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या नांवे महाराष्ट्रात संबंधित क्षेत्रात महाराष्ट्रामध्ये मुलभूत, पथदर्शी व भरीव कार्य करणाऱ्या एका व्यक्तीची किंवा संस्थेची निवड रु. २,००,०००/- चे पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात यईल.

- संस्था या संज्ञेखाली महाराष्ट्रातील सार्वजनिक विश्वस्त संस्था नोंदणी अधिनियम, सहकारी कायदा वा कंपनी कायद्याखाली नोंदणी झालेल्या संस्था यांचा समावेश होईल.
- ज्या क्षेत्रातील परितोषिकासाठी प्रस्ताव करण्यात आला असेल, त्या क्षेत्रातील निदान सलग ५ वर्षाच्या कामाचा विचार निवड मंडळ करील.
- निवड मंडळाने एकमताने वा बहुमताने निवडलेल्या व्यक्तीस किंवा संस्थेसपारितोषिक व स्मृतिचीन्ह दिले जाईल.
- निवड मंडळास एखादया वर्षी संबंधित क्षेत्रात योग्य व्यक्ति किंवा संस्थापारितोषिकास पात्र वाटली नाही तर त्यावर्षी पारितोषिक दिले जाणार नाही.
- निवड झालेल्या पारितोषिक पात्र व्यक्तिस किंवा संस्थेस पुन्हा पा वर्षापर्यंत त्याच क्षेत्रातील कामाच्या परितोषिकासाठी विचारात घेतले जाणार नाही.
- निवड मंडळास निर्णय हा अंतिम राहील.

## निवड मंडळ :

- परितोषिकासाठी स्वतः इच्छूक व्यक्ति वा त्यांच्या संस्थेने केलेल्या अर्ज विचारत घेतला जाणार नाही.
- आमदार, खासदार, महानगरपालिका महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष, राज्यस्तरीय सहकारी व स्वयंसेवी संस्थेचे पदधिकारी, व्यापारी औद्योगिक संस्थांचे अध्यक्ष, विद्यापीठाचे उपकुलगुरू त्याचप्रमाणे नामवंत साहित्यिक, प्रमुख सामाजिक कार्यकर्ते, कलावंत यांना पारितोषिकासाठी योग्य व्यक्तिकिंवा संस्थांची शिफारस करून प्रस्ताव पाठवता येईल.
- पारितोषिकासाठी ज्या व्यक्तिची वा संस्थेची शिफारस करावयाची आहेत्यांची संपूर्ण माहिती खालील मार्गदर्शक सूचनांप्रमाने मराठीत पाठवावी.

- सोबत पाठविलेले फोटो, दाखले, लिखाण किंवा इतर साहित्य परत करणे शक्य होणार नाही.  परंतु त्याबाबतीत निवडमंडळाने मागितल्यास वरील कागतपत्रांच्या मूळ प्रति प्रतिष्ठांकडे सादर कराव्या लागतील. अशा मूळ प्रति परितोषिक वितरणानंतर परत केल्या जातील.

- अशा शिफारशी वा प्रस्ताव जाहिर केलेल्या अंतिम तारखेपूर्वी प्रतिष्ठानच्या मुंबई कार्यालयात प्राप्त होणे आवश्यक आहे.

- प्रतिष्ठानची कार्यकारी समिती या पारितोषिकासाठी निवड मंडळ म्हणून काम करतील.

- वरील शिफारशी किंदा प्रस्तावांशिवाय इतर योग्य व्यक्ति वा संस्था निवडण्याचा अधिकार कार्यकारी समितीस राहील.

## मार्गदर्शक सुचना :

- ज्या व्यक्तीची शिफारस केली आहे. त्यांचे संपूर्ण नांव, पूर्ण पत्ता, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता (थोडक्यात त्यांचा बायोडेटा) व पासपोर्ट साईजचे दोन अलिकडील फोटो व कार्याचा माहिती प्रस्तावाबरोबर पाठवावेत.

- संस्थेची शिफारस असेल तर त्या संस्थेचे पूर्ण नांव, पत्ता, नोंदणी क्रमांक व तारीख सध्याचा पदाधिका-यांची पूर्ण नांवे व पते, थोडक्यात त्या संस्थेचा परिचय, कार्याची माहिती गेल्या तीन वर्षाचे वार्षिक अहवाल व लेखा परीक्षकांचा अहवाल प्रस्तावाबरोबर पाठवावा.

- अशा कार्याची ठळक वैशिष्टये त्याचे महाराष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्व, त्याचा आजूबाजूच्या परिसरावर कार्यकर्त्यांवर झालेला परिणाम व इतरत्र अनुकरणीय असा त्या कार्यातील भाग याची माहिती द्यावी. शिफारस केलेल्या व्यक्तिला किंवा संस्थेला यापूर्वी पारितोषिके, बक्षिसेकिंवा मानमान्यता मिळाली असेल त्याचा संपूर्ण तपशील द्यावा.

- शिफारस करणाऱ्या व्यक्ति/ संस्था यांचे नांव, पत्ता, ई-मेल, टेलिफोन व संपर्कासाठी आवश्यक ती माहिती.

- इतर काही आवश्यक माहिती.